भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक १४.१२.२०१९ ते १८.१२.२०१९)

अंक १००/२०१९ | दिनांक १३.१२.२०१९ | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०७/११/२०१९ ते १३/१२/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १४/१२/२०१९ ते १८/१२/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/१२ | ०८/१२ | ०९/१२ | १०/१२ | ११/१२ | १२/१२ | १३/१२ | दिनांक | १४/१२ | १५/१२ | १६/१२ | १७/१२ | १८/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.० | ३५.० | ३६.० | ३६.० | ३५.० | ३५.० | ३५.० | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३४ |
| १९.५ | २०.० | २०.५ | २१.० | १९.५ | १९.० | २०.० | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २२ | २२ | २२ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ - मेघाच्छादन (ऑक्टा.) | ५ | २ | ६ | ४ | ४ |
| निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | |
| ८९ | ९१ | ९३ | ८८ | ९१ | ९१ | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७४ | ७३ | ७३ | ७१ | ६८ |
| ४६ | ४७ | ४२ | ४६ | ४६ | ३३ | ४६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४६ | ४१ | ४१ | ४० | ३६ |
| २.८ | १.१ | १.० | १.५ | ०.९ | ०.७ | १.१ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००७ | ००६ | ००६ | ००८ | ००८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ - वा-याची दिशा | ईशान्ये कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून |
| दक्षिण | दक्षिण | पश्चिम | पूर्वे | पूर्वे | दक्षिण | दक्षिण | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४५९१.० | ४५९१.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यामध्ये हवामान कोरडे व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

### हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | रब्बी हंगामातील भात लागवडीच्या पुर्व तयारीस सुरुवात करावी. रोपवाटीका लागवडीयोग्य झाली असल्यास पहिल्या पिकाच्या कापणी नंतर नांगरट करुन ७.५ टन शेणखत किंवा कंपोस्ट खत एकसारखे मिसळावे. चिखलणीच्या वेळी हेक्टरी ५.० टन गिरीपुष्प हिरवळीचे खत शेतात मिसळावे. |
| कुळीथ व चवळी | रोप ते शाखिय वाढ | अंगओलीत असल्यास कुळीथाला पाण्याची गरज नसते. परंतु ओलावा कमी असलेल्या जमिनीमध्ये पिकाला फुलो-यात असताना आणि शेंगा पोसण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पिक फुलो-यात न येता फक्त शाखिय वाढ होत राहते. यासाठी पाण्याचा अति वापर टाळावा. |
| कडवा वाल | रोप ते शाखिय वाढ | वाल पिकास पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थांमध्ये जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे. पिकाला फुलो-यात असताना आणि दाणे भरण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. ज्यादा पाण्यामुळे वालाची शाखिय वाढ होते व उत्पन्न घटते. |
| भुईमुग, सुर्यफुल व मोहोरी | रब्बी पेरणी | रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावी. जमिन खोल नांगरुन, ढेकळे फोडुन व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळुन तयार करावी. पेरणीसाठी टी.जी.२६, टी.ए.जी.२४, टी.पी.जी.४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणात वापरावे.<br>रबी सुर्यफुल लागवडीसाठी जमिन उभी-आडवी खोल नांगरुन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टर १० ते टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट जमिनीवर पसरुन मातीत मिसळावे. पेरणीसाठी. पेरणीसाठी सुर्यफुलाच्या मॉर्डन, एस.एस.५६, बी.एस.एच-१ इ. सुधारीत जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवुन नंतर सावलीत वाळवावे. तसेच प्रती किलो २ ग्रम या प्रमाणात बुरशीनाशक चोळावे.<br>मोहरी पिकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने पुसा बोल्ड किंवा वरुणा या जातीची लागवड करावी. पिकाची पेरणी ४५ x १० से.मी अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपुर्वी प्रती गुंठ्यास १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन द्यावे. |
| आंबा | पालवी | यावर्षी लांबलेल्या मान्सुनोत्तर पाऊसामुळे आंबा फळ पिकास आवश्यक असणारा पाण्याचा ताण न मिळाल्यामुळे आंब्याची मोहोर अवस्था लांबणीवर पडली आहे. तसेच नोव्हेंबर महिन्यातील चक्रिय वादळामुळे व सततच्या ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानात घट झाली नाही व मोहोर अवस्था येण्यासाठी आवश्याक असणारे तापमान व हवामान न मिळाल्यामुळे मोहोर अवस्था लांबणीवर जाण्याची शक्यता आहे.<br>पालवीवर मोठ्या प्रमाणावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास तुडतुडे, फुलकीडे व खवले किडीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८% प्रवाही (०.९ मिली प्रती १ लीटर पाणी) किंवा थायोमेथॉक्झोन २५% (WDG) (०.१ ग्रम प्रती लीटर पाणी) या किटकनाशकांची फवारणी करावी. आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे. |
| काजु | मोहोर | ढगाळ वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढुळन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि. ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पडलेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ओफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)